ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# लघुउद्योगांच्या आर्थिक विकासात मुद्रा योजनेचे योगदान

**दिवटे प्रियंका साहेबराव**

*संशोधक विद्यार्थी*

*Corresponding Author:* दिवटे प्रियंका साहेबराव

**DOI - 10.5281/zenodo.14875335**

***गोषवारा:***

*भारत हा विकसनशील देश आहे भारताची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी त्याचा सर्वांगीण क्षेत्रातून विकास होणे गरजेचे असते. भारताच्या अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्र व सेवा क्षेत्रांचा विकास होणे गरजेचे असते PMMY योजनेद्वारे नवउद्योजकांना सहजरित्या कर्ज पुरवठा होऊन त्यातून उद्योगांच्या वाढीमुळे नवनवीन रोजगार साठी निर्मिती होण्यास मदत होते या रोजगार निर्मितीमुळे सामान्यांच्या आर्थिक स्थितीत हळूहळू सुधारणा होत असते व त्यांच्या राहणीमानाचा दर्जा ही सुधारला जातो. याचा सदर संशोधनात अभ्यास करता येणार आहे. मुद्रा योजनेअंतर्गत कर्ज देण्यासाठी आरबीआय बँकेच्या अखत्यारित सि.डी.बी ही बँक उप-कंपनी म्हणून कार्य करते. व कोणत्याही प्रकारची संपत्ती तारण न ठेवता नवीन उद्योगांना रोजगार निर्मितीसाठी व जुन्या उद्योगांचा विस्तार करण्यासाठी कर्ज देते यासाठी सदरील संशोधक कार्य सामान्यांना उद्योगांसाठी प्रोत्साहन देण्याचे कार्य करण्यास हातभार लावते.भारताच्या आर्थिक विकासात प्रधानमंत्री मुद्रा योजनेचे योगदान या अभ्यास संशोधन लेखनातून निदर्शनात येणार आहे.*

***कळीचे शब्द : लघुउद्योग, भारतीय अर्थव्यवस्था, औद्योगिक धोरण, प्रधानमंत्री मुद्रा कर्ज योजना, आर्थिक विकास***

**प्रस्तावना:**

भारत हा विकसनशील देश आहे. भारताच्या आर्थिक क्षेत्रात वाढ होण्यासाठी कृषी क्षेत्र औद्योगिक व सेवा क्षेत्रांचा विकास होणे गरजेचे असते देशाच्या एकूण अर्थव्यवस्थेचा विकास करावयाचा असेल तर उद्योग क्षेत्राच्या विकासाशिवाय गत्यंतर नाही, कारण उद्योग क्षेत्राचा विकास हा इतर क्षेत्राच्या तुलनेत जास्त व लवकर होत असतो. देशाच्या एकूणच अर्थकारणामध्ये अलीकडच्या काळात वाढलेल्या लघु उद्योगांचे योगदान नजरेआड करून चालणार नाही .लघु उद्योगाची ही अफाट क्षमता लक्षात घेता प्रधानमंत्री या सर्व नवउद्योगांच्या सक्षमीकरणासाठी मुद्रा बँकेच्या माध्यमातून वित्तीय आधाराचा एक प्रकारचा बूस्ट देऊ केले आहे.

लघु व कुटीर उद्योगांच्या वित्तीय साहाय्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मुद्रा बँक योजना जाहीर केली उद्योजकास अर्थसाह्य म्हणजे सहजगत्या कर्ज पुरवठा PMMY योजनेमार्फत केला जातो अशा कर्ज पुरवठ्यातून सामान्यांना उद्योग स्थापन करून त्यातून रोजगार निर्मिती करण्याची संधी व प्रेरणा मिळते.भारतातील तरुणांना प्रोत्साहित करून उद्योजक होण्याकडे प्रेरित करण्यासाठी ही योजना महत्वपूर्ण ठरते या योजनेद्वारे देशाच्या आर्थिक स्थितीत वाढ होण्यास निश्चितच हातभार लागतो प्रधानमंत्री मुद्रा योजना ही माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 8 एप्रिल 2015 रोजी सुरू केलेली योजना आहे बिगर को-ऑपरेटिव्ह बिगर शेती लघु किंवा सूक्ष्म उद्योगांना रुपये 10 लाखाचे कर्ज PMMY या अंतर्गत मुद्रा कर्ज म्हणून वर्गीकृत आहेत ही कर्ज व्यावसायिक बँक RRB लघु वित्तीय बँकMFI आणि NBFC द्वारे दिली जातात. कर्जादारावर नमूद केलेल्या कोणत्याही कर्ज देणाऱ्या संस्थांशी संपर्क साधू शकतो. किंवा

www.udyamimitra.in या पोर्टल द्वारे ऑनलाईन अर्ज करू शकतो. PMMY च्या आश्रयाने mudra ने लाभार्थी सूक्ष्म युनिट किंवा उद्योजकांच्या वाढीचा किंवा विकासाचा हप्ता आणि निधीच्या गरजा दर्शवण्यासाठी शिशु किशोर आणि तरुण हे तीन उत्पादने तयार केली आहेत.

"मायक्रो इन डेव्हलपमेंट अँड रिफायनान्स एजन्सी लि." मुद्रा ही एक एन. बी . एफ.सी आहे जी देशातील सूक्ष्म उद्योग क्षेत्राच्या विकासाला मदत करते.

- शिशु -5000 रु.पर्यंतचे कर्ज कव्हर करणे.
- किशोर- 5000 ते पाच लाखापर्यंत चे कर्ज कव्हर करणे.
- तरुण-5लाख ते रुपये 10 लाखापर्यंतचे कर्ज कव्हर करणे.

नवीन पिढीच्या इच्छुक तरुणांमध्ये उद्योजकतेला चालना देण्याच्या उद्देशाने हे सुनिश्चित केले जाते की, शिशु श्रेणी युनिट आणि नंतर किशोर आणि तरुण श्रेणीवर अधिक लक्ष केंद्रित केले जाईल.शिशु किशोर आणि तरुण अंतर्गत सूक्ष्म उद्योग क्षेत्राचा विकास आणि वाढीच्या चौकटीत आणि एकूण उद्दिष्टात मुद्रा द्वारे ऑफर केलेली उत्पादने विविध तंत्र किंवा व्यवसाय क्रियाकलाप तसेच उद्योजक विभागाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अशा प्रकारे डिझाईन केलेले आहे.

संशोधन पद्धती- प्रस्तुत संशोधन लेखात प्राथमिक तसेच दुय्यम पद्धतीच्या सहाय्याने तथ्य संकलन केले जाणार आहेत. व त्या तथ्याचे विश्लेषण करण्यासाठी योग्य असेल त्या चाचणीचा अवलंब केला जाणार आहे, त्याचबरोबर तथ्याचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी टक्केवारी आलेख इत्यादी संख्या तंत्राचा वापर करण्यात येणार आहे.

प्रधानमंत्री मुद्रा योजना (PMMY) ही भारत सरकारने 8 एप्रिल 2015 रोजी सुरू केलेली एक महत्त्वाकांक्षी योजना आहे, जी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (MSME) आर्थिक मदत करण्यासाठी आहे. या योजनेचा उद्देश लघु व्यवसायांना प्रोत्साहन देणे, स्वरोजगार निर्माण करणे आणि उद्योजकतेला चालना देणे आहे.

**प्रधानमंत्री मुद्रा योजनेचे स्वरूप:**

**1. उद्दिष्टे:**

लघु, सूक्ष्म आणि मध्यम उद्योगांना (MSME) वित्तीय मदत पुरवणे.बेरोजगारी कमी करणे व उद्योजकतेला प्रोत्साहन देणे. ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये व्यवसायिक विकास करणे.

**2. मुद्रा कर्जाची श्रेणी:**

- शिशु: ₹50,000 पर्यंतचे कर्ज.
- किशोर: ₹50,001 ते ₹5 लाख पर्यंतचे कर्ज.
- तरुण: ₹5 लाख ते ₹10 लाख पर्यंतचे कर्ज.

**3. कर्जाची व्याजदर:**

व्याजदर संस्था आणि बँकांद्वारे निश्चित केली जाते, जी साधारणतः 8% ते 12% असते

**4. गिरवी ठेव नाही:**

या योजनेत कर्जासाठी कोणत्याही प्रकारचे जामीन किंवा संपत्ती गहाण ठेवण्याची आवश्यकता नाही.

**5. कर्ज अर्ज प्रक्रिया:**

बँका, मायक्रोफायनान्स संस्था किंवा NBFC (गैर-बँकिंग वित्तीय संस्था) यांच्या मार्फत अर्ज करता येतो.

**प्रधानमंत्री मुद्रा योजनेची व्याप्ती:**

**1. लक्ष्य गट:**

लघु व्यवसाय करणारे, महिला उद्योजक, दुकानदार, हस्तकला करणारे, छोटे उत्पादक व सेवा पुरवठादार.

**2. गैर-कृषी क्षेत्र:**

योजना मुख्यतः गैर-कृषी क्षेत्रावर केंद्रित आहे, पण कृषी-संबंधित काही उपक्रम, जसे की डेअरी, पोल्ट्री, मधमाशी पालन यांना देखील यात समाविष्ट केले आहे.

**3. मुख्य क्षेत्र:**

उत्पादन, व्यापार, सेवा उद्योग, खाद्य प्रक्रिया, हस्तकला, वाहन दुरुस्ती, छोट्या उद्योगांचे व्यवस्थापन.

**4. महिलांना प्रोत्साहन:**

महिलांसाठी विशेष सवलती दिल्या जातात, ज्यामुळे महिला उद्योजकतेला चालना मिळते.

**5. रोजगार निर्मिती:**

लघु व्यवसाय व स्वरोजगाराच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण केला जातो उपलब्धी (2023 पर्यंत): लाखो छोटे उद्योजक व व्यावसायिकांना आर्थिक मदत मिळाली आहे.

महिलांसाठी आणि अनुसूचित जाती/जमातींसाठी विशेष प्राधान्य.ग्रामीण व शहरी भागात लघु उद्योगांना चालना मिळाली.प्रधानमंत्री मुद्रा योजना लघु उद्योगांना आर्थिक पाठबळ देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, ज्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था अधिक मजबूत होत आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे:**

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

1. प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत सुरू झालेल्या व्यवसायाचा आढावा घेणे.
2. प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत व्यवसाय करणाऱ्या उद्योजकांच्या आर्थिक स्थितीत होणाऱ्या बदलांचा अभ्यास करणे.
3. प्रधानमंत्री मुद्रा योजना अंतर्गत सुरू झालेला व्यवसाय जिल्ह्यांच्या आर्थिक विकासात मदतीचे ठरतात याचा अभ्यास करणे
4. प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत व्यवसाय करणाऱ्या उद्योजकांच्या समस्या चा अभ्यास करणे

मुद्रा कर्जाचा उद्देश-मुद्रा कर्ज विविध उद्देशासाठी विस्तारित केले जाते ज्यामुळे उत्पन्न आणि रोजगार निर्मिती होते कर्ज मुख्याता यासाठी वाढवले जाते.

1. विक्रेते व्यापारी दुकानदार आणि इतर सेवा क्षेत्रातील क्रियाकलपासाठी व्यवसाय कर्ज दिले जातात
2. मुद्रा कार्ड द्वारे कार्यात भांडवल कर्ज
3. सूक्ष्म युनिट साठी उपकरणे कर्ज
4. वाहतूक वाहन कर्ज फक्त व्यावसायिक वापरासाठी
5. ट्रॅक्टर टिलर तसेच दुचाकी कर्ज फक्त व्यावसायिक कारणासाठी वापरल्या जातात
6. कृषी संलग्न बिगर शेती उत्पन्न देणाऱ्या उपक्रमासाठी कर्ज उदा. मत्स्यपालन मधुमक्षिका पालन कुक्कुटपालन

**Mudra कर्ज अंतर्गत कव्हर करता येणाऱ्या क्रियाकलपाची उदाहरणात्मक यादी खालील प्रमाणे:**

**1. वाहतूक वाहन:** ऑटोरिक्षा लहान मान वाहतूक वाहने तीन चाकी रिक्षा टॅक्सी इत्यादी माल आणि प्रवाशांच्या वाहतुकीसाठी वाहतूक वाहनांची खरेदी फक्त व्यावसायिक कारणासाठी वापरलेले ट्रॅक्टर/ ट्रली/ पावर टिलर देखीलPMMY अंतर्गत मदतीसाठी पात्र आहे व्यावसायिक कारणासाठी वापरल्या जाणाऱ्या दुचाकी देखील PMMY अंतर्गत कव्हरेजसाठी पात्र आहेत.

**2. सामुदायिक सामाजिक आणि वैयक्तिक सेवा:** उपक्रम-सलून ब्युटी पार्लर व्यायामशाळा बुटीक टेलरिंग दुकाने ड्रायक्लिनिंग सायकल आणि मोटरसायकल दुरुस्तीची दुकाने डीटीपी आणि फोटोकॉपी सुविधा कुरिअर एजंट इत्यादी

**3. अन्न उत्पादन क्षेत्रे:** पापड बनवणे आचार बनवणे जाम किंवा जेली बनवणे. ग्रामीण स्तरावर कृषी उत्पादनाचे जतन करणे मिठाईची दुकाने लहान सेवा खाद्यपदार्थांचे स्टॉल आणि दैनंदिन सेवा कोल्ड चेन वाहने कोल्ड स्टोरेज बर्फ बनवण्याचे युनिट आईस्क्रीम यासारखी उपक्रम युनिट बनवणे बिस्किट ब्रेड बनवणे इ.

**4. कापड उत्पादन क्षेत्र:** हातमाग यंत्रमाग खादी क्रिया कला जरी आणि जरदोरीवर पारंपारिक भरतकाम आणि हातकाम पारंपारिक रंग आणि छपाई कपडे डिझाईन विणकाम कॉटन जिनिंग संगणकृत भरतकाम शिलाई आणि इतर कापड विणलेली वस्त्र उत्पादने जसे की पिशव्या वाहन उपकरणे इत्यादी

**5. व्यापारी आणि दुकानदारांसाठी व्यावसायिक कर्ज:** व्यक्तींना त्याची दुकाने किंवा व्यापार आणि व्यावसायिक उपक्रम किंवा सेवा उपक्रम आणि लाभार्थी कर्जाच्या आकारमानासह बिगर शेती उत्पन्न देणारे उपक्रम चालवण्यासाठी आर्थिक सहाय्य म्हणून रुपये 10 लाख प्रती कर्जदारांना कर्ज दिले जाते.सूक्ष्म युनिटीसाठी उपकरणे वित्तीय योजना-रुपये दहा लाख पर्यंतच्या प्रती लाभार्थी कर्जाच्या आवश्यक यंत्रसामग्री किंवा उपकरणे खरेदी करून सूक्ष्म उपक्रमाची स्थापना करणे.

**शेतीशी निगडित उपक्रम:** शेतीशी संबंधित उपक्रम उदाहरणार्थ मत्स्यपालन मधुमक्षिका पालन कुकुट पालन पशुपालन प्रतवारी वर्गीकरण एकत्रिकरण कृषी उद्योजक डायरी कृषी व्यवसाय केंद्र अन्न आणि कृषी प्रक्रिया इत्यादी (पीक कर्ज वगळून जमीन सुधारण्यासाठी जसे की कालवे सिंचन आणि विहिरी) आणि त्यांना आधार देणाऱ्या सेवा उत्पन्न वाढवतात ते सर्व PMMY अंतर्गत कव्हरेजसाठी पात्र असतात

**मुद्रा कार्ड:** मुद्रा कार्ड हे कर्जाच्या खेळत्या भांडवलाच्या भागासाठी मुद्रा कर्ज खात्यावर जारी केलेले डेबिट कार्ड आहे कर्जदार मुद्रा कर्जाचा वापर एकाधिक ड्रॉ क्रेडिट मध्ये करू शकतो जेणेकरून खेळत्या भांडवलाच्या मर्यादा की कीफायतशीर पद्धतीने व्यवस्थापित करता येईल आणि व्याजाचा बोजा कमीत कमी ठेवता येईल मुद्रा कार्ड मुद्राव्यवहाराचे डिजिटल लायजेशन आणि कर्जदारांसाठी क्रेडिट इतिहास तयार करण्यात देखील मदत करते मुद्राकाळ कोणत्याही एटीएम किंवा मायक्रो एटीएम मधून पैसे काढण्यासाठी कोणत्याही पॉईंट ऑफ सेल मिशनद्वारे पैसे काढण्यासाठी देशभरात ऑपरेट केले जाऊ शकते.

**मुद्रा योजनेची वैशिष्ट्ये:**

1. देशातील 5.77 कोटी उद्योजकांना वित्त सहाय्य
2. वार्षिक ७ टक्के दराने १० लाखा रुपयापर्यंत अर्थ पुरवठा
3. 20000 कोटींचे सरकारचे भांडवली पाठबळ
4. फिर भी ची ही उप कंपनी रिझर्व बँकेच्या आखत्यारित येते
5. सूक्ष्म वित्त संस्थे व्यतिरिक्त बँके करिता स्वतंत्र विधायक

**मुद्रा लोन साठी आवश्यक बाबी:**

1. १ कोणत्याही प्रकारचे मॉर्गेज ठेवावे लागत नाही.
2. २. स्वतःचे १० टक्के भाग भांडवलाची गरज नाही.
3. ही योजना फक्त सरकारी बँकेतच मिळते .
4. अर्जदार कोणत्याही बँकेचा थकबाकीदार नसावा.

**लघु उद्योजकांच्या विकासात प्रधानमंत्री मुद्रा योजनेच्या उपाययोजना:**

लघु उद्योजकांच्या व्यवसायाला चालना देण्यासाठी प्रधानमंत्री मुद्रा योजना (PMMY) उपयुक्त आहे. मात्र, या योजनेचा लाभ सर्व लघु उद्योजकांपर्यंत

पोहोचवण्यासाठी काही उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. योजनेची प्रभावी अंमलबजावणी आणि सुधारणा यासाठी खालील उपाययोजना महत्त्वाच्या आहेत:

**1. माहिती आणि जनजागृती:**

**योजनेबद्दल प्रचार:** लघु उद्योजकांना योजना आणि तिच्या लाभांविषयी माहिती देण्यासाठी गावागावांमध्ये जनजागृती शिबिरे आयोजित करावीत.

**डिजिटल प्रचार:** डिजिटल माध्यमे, जसे की सोशल मीडिया, वेबसाइट्स आणि ॲप्सद्वारे योजनेची माहिती अधिक लोकांपर्यंत पोहोचवावी.

**2. कर्ज प्रक्रियेची सुलभता:**

**सोप्या प्रक्रियेसाठी तंत्रज्ञानाचा वापर:** ऑनलाइन कर्ज अर्ज प्रक्रिया अधिक सोपी आणि पारदर्शक करावी. अर्जदारांसाठी एकच विंडो सुविधा उपलब्ध करून द्यावी

**कागदपत्रे कमी करणे:** कर्ज मिळवण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची संख्या कमी करावी आणि प्रक्रिया जलद करावी.

**3. प्रशिक्षण आणि कौशल्य विकास:**

**व्यवसाय व्यवस्थापन प्रशिक्षण:**लघु उद्योजकांसाठी व्यवसाय कसे चालवायचे याविषयी प्रशिक्षण कार्यक्रम राबवावेत.

**तांत्रिक प्रशिक्षण:** उद्योजकांना आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल साधने, ई-कॉमर्स आणि उत्पादन तंत्रज्ञान याबद्दल मार्गदर्शन करावे.

**4. ग्रामीण आणि दुर्गम भागावर विशेष लक्ष:**

**ग्रामीण उद्योजकांना प्रोत्साहन:** ग्रामीण आणि दुर्गम भागातील लघु उद्योजकांना कर्ज देण्याची प्राधान्यक्रम सूची तयार करावी.

**सुविधा आणि संसाधने:** ग्रामीण भागात व्यवसायासाठी लागणाऱ्या सुविधा, जसे की वीज, पाणी, वाहतूक इत्यादींची व्यवस्था करावी.

**5. महिला उद्योजकांसाठी विशेष सवलती:**

**महिला सक्षमीकरण:** महिला उद्योजकांना कर्जावर विशेष सवलती, कमी व्याजदर, आणि कर्ज परतफेडीसाठी लवचिक नियम लागू करावेत.

**महिला बचत गट:** महिला बचत गटांना मुद्रा योजनेंतर्गत एकत्रित कर्ज उपलब्ध करून द्यावे.

**6. कर्ज परतफेडीची लवचिकता:**

**परतफेड सुलभ करणे:** लघु उद्योजकांना व्यवसायाची गती वाढेपर्यंत परतफेडीसाठी अधिक कालावधी द्यावा. आर्थिक संकट असलेल्या उद्योजकांना परतफेडीसाठी मदतीचे पर्याय द्यावेत.

**7. तांत्रिक आणि आर्थिक सहाय्य:**

**मार्गदर्शन केंद्र:** प्रत्येक जिल्ह्यात उद्योजकांसाठी मार्गदर्शन आणि सहाय्य केंद्रे उभारावीत.

**सल्लागार सेवा:** व्यवसायाचे नियोजन, कर्ज व्यवस्थापन, आणि विस्तार यावर सल्ला देण्यासाठी सल्लागार नियुक्त करावेत.

**8. बँकांचा सहभाग वाढवणे:**

**प्रोत्साहन:** बँकांना अधिकाधिक कर्ज वाटप करण्यासाठी प्रोत्साहन दिले जावे.

**नियोजन:** बँकांनी लघु उद्योजकांसाठी वेगवेगळ्या कर्ज योजना तयार कराव्यात.

**9. फसवणूक टाळणे:**

**पारदर्शकता:** कर्ज वितरण प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा उपयोग करावा.

**तक्रार निवारण यंत्रणा:** कर्ज प्रक्रियेतील कोणत्याही अडचणीसाठी तक्रार निवारणासाठी प्रभावी यंत्रणा स्थापन करावी.

**10. योजनेच्या प्रगतीवर नियमित निरीक्षण:**

**मूल्यांकन:** योजनेच्या प्रगतीचे नियमित परीक्षण करून सुधारणा करण्यासाठी उपाययोजना राबवाव्यात.

**डेटा विश्लेषण:** कर्ज घेणाऱ्यांचा डेटा गोळा करून त्यांच्या व्यवसायाच्या यशाची टक्केवारी तपासावी आणि यशस्वी उपक्रमांना प्रोत्साहन द्यावे.

**निष्कर्ष :**

मुद्रा योजना लघु उद्योजकांसाठी महत्त्वाची असून तिचा अधिक प्रभावी उपयोग करण्यासाठी वरील उपाययोजना राबविल्यास व्यवसायांना भांडवलाची चांगली सुविधा मिळेल. तसेच, रोजगार निर्मिती, महिला सक्षमीकरण आणि स्थानिक विकासाला गती मिळेल.

**संदर्भ सूची:**

1. संशोधन पद्धती वि.भा .पाटील
2. प्रा. बोधनकार सुधीर अलोणी विवेक, सामाजिक संशोधन पद्धती, प्रकाशक ललिता पुराणिक, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, द्वितीय आवृत्ती १९९९
3. www.mudra.org.in
4. web.umang.gov.in
5. pmmodiyojna.in
6. www.wikipedia.org
7. mr.vikaspedia.in
8. www.sbi.in
9. www.yojanapdeida.com